# भारतीय जनता पक्ष

(केंद्रिय कार्यालय)

11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001

फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787

## संसदेत राष्ट्रपतिंच्या वक्तव्याबद्दल भाजपने माजी राष्ट्रिय अध्यक्ष आणि खासदार एम.व्यंकय्या नायडु यांची प्रतिक्रिया

नवी दिल्ली, दि.21फेब्रुवारी, 2013

राष्ट्रपतींनी संसदेत दिलेले वक्तव्य संपूर्णपणे निराशाजनक, दिशाहीन आणि निरुत्साही आहे. देशासमोरची आव्हाने खास करुन व्यापक भ्रष्टाचार, बेफाम महागाई, कृषिक्षेत्राचे संकट, शेतक-यांची आत्महत्या, वाढत चाललेली बेकारी वगैरेंचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. सरकारने त्या समस्या सोडवण्यासाठी कोणती ठोस भावी उपाययोजना करण्यास असफल ठरले आहे.

राष्ट्रपतिंच्या वक्तव्यात गंभीर आर्थिक संकटांचा मात्र उल्लेख करण्यात आलेला आहे, पण ती सोडवण्यासाठी कोणती पावले उचलावीत याची माहिती मात्र देण्यात आलेली नाही. आर्थिक तूट 5.5 टक्के आखण्यात आली आहे आणि एकूण राष्ट्रिय उत्पन्न(जीडीपी) त कपात होऊन 5 टक्के इतके झाले आहे. सरकार या सर्वाबाबत दिशाहीन आहे आणि त्यामुळेच राष्ट्रपतिंचे वक्तव्य निस्तेज आहे.

सेंट्रल हॉलमध्ये राष्ट्रपतिंचे वक्तव्य खुपच निराशाजनक राहिले आणि त्याला सत्ताधारी पक्षच जवाबदार आहे. सत्ताधारी पक्षांच्या आघाडीत सहाभागी झालेले काही पक्षांचे सदस्य हाती प्ले कार्ड घेउन, घोषणाबाजी केली. त्यांनी राष्ट्रपतिंच्या वक्तव्याला विरोध केला ही बाब अभूतपूर्व आहे. युपीएत सर्व काही आलबेल नाही, असे विपक्षांच्या आक्षेपाला या दृश्याने समर्थन मिळाले. युपीए आणि कॉंग्रेस पक्षाला हे माहित नाही का, की आघाडीचे सरकार कशाप्रकारे चालते आणि देशाची सत्ता कशाप्रकारे चालवायची.